**<u>नि.दि.दा.क्र. ३३५/२०११</u>**

विठ्ठल लबडे व इतर वि. राजाराम व इतर

**<u>नि.क्र.१०५ लगत.</u>**

**वादींतर्फे साक्षीदार क्र.२**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | मैनाबाई राजाराम लबडे |
| वय | – | ६० वर्षे, |
| व्यवसाय | – | मजुरी, |
| राहणार | – | टाकळी खंडेश्वरी, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

**<u>उर्वरीत उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ३, २० व २२ तर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

८. हे खरे नाही की, माझ्या पतीने प्रतिवादी क्र. २२ ला विकलेल्या जमिनीशी माझा काही संबंध नाही. माझा मुलगा विठ्ठल याच्या पत्नीचे नाव राणी आहे. हे खरे नाही की, माझ्या नावावरील काही जमिन मी विठ्ठलची पत्नी राणी हिच्या नावावर केली आहे. हे खरे नाही की, राणी हिच्या नावे जमिन आहे. हे खरे नाही की, माझ्या नावावरील जमिन राणीच्या नावे पाकळीस्त खरेदीखताने मी दिलेली आहे. हे खरे नाही की, माझा मुलगा विठ्ठलच्या नावावर कर्जत येथे प्लॉट आहे. हे खरे नाही की, माझ्या नावावर टाकळी खंडेश्वरी येथे गट क्र. १३२/१ व १३२/४ आहे. हे खरे नाही की, माझ्या मुलाच्या नावे कर्जत येथे १६५/१/२० जागा आहे. हे खरे नाही की, माझी सुन राणी हिच्या नावावर सर्व्हे क्र. १९८ व सर्व्हे क्र. २१४/२ आहे. हे खरे आहे की, मला असे म्हणायचे आहे की, वादी क्र. १, त्याची पत्नी व माझ्या नावावर कोणतेही क्षेत्र नाही. हे खरे आहे की, टाकळी खंडेश्वरी गावात मैनाबाई लबडे नावाची मी एकमेव व्यक्ती आहे. आमच्या गावात विठ्ठल लबडे नावाचा एकच व्यक्ती आहे. हे खरे आहे की, राणी विठ्ठल लबडे ही आमच्या गावातील एकमेव व्यक्ती आहे.

९. हे खरे आहे की, माझे पती राजाराम लबडे हे मुळचे बाभळगावचे आहेत. हे

खरे नाही की, सन १९७२ मध्ये दुष्काळ पडल्यामुळे माझे पती गाव सोडून बाहेरगावी गेले होते. हे खरे नाही की, माझ्या पतीने ऊस तोडणी करुन, मुकादमी काम करुन वादमिळकती विकत घेतलेल्या आहेत. माझ्या शपथपत्रात काय मजकुर नमुद केला आहे हे मला सांगता येत नाही. हे खरे नाही की, माझ्या वकीलांनी तयार केलेल्या शपथपत्रावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, माझे पती व मुलगा दत्तात्रय याने स्वकष्टाने वादमिळकती मिळवलेल्या आहेत. हे खरे नाही की, वादमिळकतीशी माझा व माझा मुलगा विठ्ठल याच्याशी संबंध नाहीत.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र ४ ते १९ व २१ यांच्यामार्फत –**

**प्रतिवादी क्र ४ ते १९ व २१ पुकारले असता गैरहजर. करिता त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.02 17:46:30 +0530

(आर. बी. राऊत)

दि.०२/०३/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कर्जत.

जि. अहमदनगर